RNI No. MAHBIL/2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

**वर्ष ५, अंक ३६]** **शनिवार, जून ८, २०१९/ज्येष्ठ १८, शके १९४१** **[पृष्ठे १४, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

केंद्र क्रमांक १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी : ०२२-२२१६ ३९६४/६५/६९, फॅक्स : ०२२-२२१६ ३९७६

ई-मेल : mercindia@merc.gov.in, वेब-साईट : www.merc.gov.in

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/२०१९/०९८.— विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(३) आणि १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून आणि पूर्व प्रसिद्धीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६' ('मुख्य विनियम') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

**१. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ**

१.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) (पहिली सुधारणा) विनियम, २०१९" असे म्हणावे.

१.२ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणा**

मुख्य विनियमांच्या विनियम २ मधील व्याख्यांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"(१३) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोव्होल्ट ॲम्पिअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) मधील विजेची मागणी जी वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने, (एक) वीज पुरवठ्याच्या करारात किंवा (दोन) अन्य लेखी पत्रव्यवहारात, मान्य करण्यात आलेली असेल;"

"(१४) (ए) **"ग्रॉस मिटरींग"** म्हणजे एक अशी मिटरींग व्यवस्था ज्यामध्ये सौर पीव्ही यंत्रणेद्वारा निर्माण झालेली संपूर्ण ऊर्जा, आंतरजोडणी मानकांनुसार अनुज्ञेय तांत्रिक मर्यादांच्या अधीन राहून, विद्युत ग्रिडमध्ये टाकण्यात येते आणि यंत्रणेच्या मालकास आयोगाकडून मान्यता मिळालेल्या किंवा स्वीकृत केलेल्या दराने वितरण परवानाधारकाला सौर ऊर्जेची विक्री केल्यामुळे लाभ होतो ;

"(१७) **"दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश"** म्हणजे सात वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;"

"(१८) **"मध्यम-कालिन मुक्त प्रवेश"** म्हणजे तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;"

"(३०) **"काल-गट"** म्हणजे रात्री ००-०० वाजता प्रथम सुरू होणारा वेळेचा प्रत्येकी १५ मिनिटांचा गट किंवा केंद्रीय आयोग आणि राज्य आयोगाकडून अधिसूचित करण्यात येईल असा अन्य अल्प कालावधी, ज्यामध्ये विशेष ऊर्जा मीटर्स विनिर्दिष्ट करण्यात आलेले विद्युत मापदंड आणि परिमाण यांची नोंद करतात."

**३. मुख्य विनियमांच्या विनियम ३ मध्ये सुधारणा**

विनियम ३ च्या विद्यमान तिसऱ्या परंतुकाच्या खाली नवीन परंतुकाची खालीलप्रमाणे भर घालण्यात येईल :—

परंतु आणखी असे की, अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकाला अर्जाच्या दिवशी वितरण परवानाधारकाशी असलेल्या त्याच्या विद्यमान करारांतर्गत मागणीपेक्षा जास्त नसणाऱ्या क्षमतेसाठी मुक्त प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात येईल, तर पूर्णतः मुक्त प्रवेश ग्राहकाला त्याच्या मंजूर भारापेक्षा जास्त नसणाऱ्या क्षमतेसाठी मुक्त प्रवेश घेण्याची परवानगी देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, नूतनशील ऊर्जेवर आधारित वीज निर्मिती करणाऱ्या निर्मात्यांकडून मुक्त प्रवेशाद्वारे वीज घेऊ इच्छिणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांना वर विनिर्दिष्ट केलेली करारांतर्गत मागणी किंवा मंजूर भाराच्या क्षमतेच्या मर्यादेपर्यंतची अट, विनियम ८.११ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेली परिणामस्वरुप निर्माण होणाऱ्या विद्युत प्रवाहाच्या अटीच्या अधीन राहून, लागू राहणार नाही :

परंतु आणखी असेही की, छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा घेऊ इच्छिणारा ग्राहक या विनियमांतर्गत एकाच वेळी मुक्त प्रवेश प्राप्त करू शकतो; अशा प्रकरणी अट लागू राहील की, ग्राहकाकडून ज्या कालावधीसाठी मुक्त प्रवेश प्राप्त करण्यात येतो त्या कालावधीसाठी सौर निर्मितीसाठीचे क्रेडीट ग्रॉस मिटरींग तत्त्वावर समायोजित करण्यात येईल. अशा ग्रॉस मिटरींग व्यवस्थेअंतर्गत विक्रीसाठी लागू असलेला दर वार्षिक सामान्य (जेनेरिक) वीज दर आदेशामध्ये नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वाच्या आधारावर ठरवून दिलेल्या दराच्या सममूल्य राहील.

**४. मुख्य विनियमांच्या विनियम ६ मध्ये सुधारणा**

ए. विद्यमान विनियम ६.७ मध्ये खालीलप्रमाणे बदलण्यात येईल :—

"६.७ नूतनशील ऊर्जा स्रोतांवर आधारित निर्मिती केंद्रे वगळता, अन्य निर्मिती केंद्रांच्या अशा अनिश्चित विजेच्या चाचणीचे आकार आणि वीज दर, तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपद्धतीचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे राहतील आणि हे अनिश्चित विजेच्या चाचणीचे आकार आणि वीज दर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ अंमलात येण्याच्या दिनांकापासून लागू राहतील :

परंतु असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी निर्मिती केंद्रामधून, नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्मिती केंद्रे वगळता, अनिश्चित विजेसाठीच्या अशा चाचणीचे आकार आणि विजेचे दर बहु-वर्षीय वीज दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहतील :

परंतु आणखी असे की, अशा चाचणीमुळे निर्मिती केंद्राकडून ग्रिडमध्ये अंतःक्षेपित केलेल्या विजेकरिता आयोगाकडून विजेचे दर निश्चित करण्यात आलेले नसतील, तर ते खालीलपैकी जे कमी असेल त्यानुसार असतील :—

(अ) राज्यांतर्गत संतुलन आणि हिशोबपूर्ती संहितेंर्गत आयोगाकडून मान्यता देण्यात आलेल्या यंत्रणा किंवा पद्धतीखाली लागू असल्यानुसार असंतुलनासाठीचा दर.

(ब) निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकाला विजेची विक्री करू इच्छित असेल त्या वितरण परवानाधारकाच्या संबंधात आयोगाने प्रचलित वीज दर आदेशामध्ये मान्यता दिल्यानुसार दीर्घ-कालिन वीज खरेदीचा सरासरी अस्थिर खर्च."

बी. विनियम ६.८ चे विद्यमान तिसऱ्या परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"परंतु असेही की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करण्यापूर्वी, निर्मिती केंद्र अशा विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाबरोबर करार करील. असा करार केलेला नसेल तर ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेल्या अशा अनिश्चित विजेसाठी कोणताही आकार लावण्यात येणार नाही आणि ही अनिश्चित वीज, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या राज्यांतर्गत संतुलन आणि हिशोबपूर्ती कार्यपद्धतीच्या तरतुदींतर्गत निर्मिती केंद्र ज्या वितरण परवानाधारकाला जोडलेले असेल, त्याच्या खाती जमा करण्यात येईल.

सी. विनियम ६.८ च्या वरील प्रस्तावित सुधारणेच्या खाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ चे नियमन करणाऱ्या नवीन परंतुकाची भर घालण्यात येईल :—

"परंतु असेही की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार प्रभावी दिनांकानंतर, अस्थिर विजेच्या अंतःक्षेपणासाठीची अट आणि त्याच्या हाताळणीचे नियमन महाराष्ट्रासाठी तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपद्धतीचे नियमन करणाऱ्या विनियमांनुसार करण्यात येईल."

**५. मुख्य विनियमांच्या विनियम ७ मध्ये सुधारणा**

विनियम ७.२ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

७.२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये मागितलेल्या मुक्त प्रवेशाचे स्वरुप आणि कालावधी खाली वर्गीकरण केल्याप्रमाणे राहील :—

| मुक्त प्रवेशाची वर्गवारी | कालावधी |
|---|---|
| दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश | सात वर्षांपेक्षा जास्त |
| मध्यम-कालिन मुक्त प्रवेश | तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु पाच वर्षांपेक्षा जास्त नसेल |
| अल्प-कालिन मुक्त प्रवेश | एक महिन्यांपेक्षा जास्त नसेल |

**६. मुख्य विनियमांच्या विनियम ८ मध्ये सुधारणा**

विनियम ८.१ च्या विद्यमान पहिल्या परंतुकाच्या वर खालीलप्रमाणे नवीन परंतुकाची भर घालण्यात येईल :—

"परंतु असे की, नोडल एजन्सी, केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्जाचे शुल्क स्वीकारण्यासह, अल्प-कालिन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जावर कार्यवाही करील. नोडल एजन्सी कार्यपद्धतीमध्ये योग्य त्या सुधारणा करून तीन महिन्यांच्या आत सुरक्षित प्रदान गेटवेसह ऑनलाईन प्रक्रियेसाठीची आवश्यक ती वेब-पोर्टल कार्यात्मकता प्रस्थापित करील. या सॉफ्टवेअरमध्ये संपूर्ण प्रक्रियेच्या दिवस किंवा वेळेचे मुद्रांकन होणे आवश्यक असेल आणि या प्रक्रियेची माहिती यंत्रणेमध्येदेखील उपलब्ध असेल."

**७. मुख्य विनियमांच्या विनियम ११ मध्ये सुधारणा**

विनियम ११.२ (ए) मध्ये तीन नवीन परंतुकांची भर घालण्यात येईल :—

"परंतु असे की, डे-अहेड मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठीचा अर्ज सतत किमान ८ तासांच्या कालावधीसाठी किंवा आयोगाने, वेळोवेळी स्वतःहून काढलेल्या किंवा बाधित पक्षकाराने केलेल्या अर्जाच्या आधारावर काढलेल्या, स्वतंत्र आदेशाच्या माध्यमातून ठरवून देण्यात आलेल्या काल-गटांच्या अशा अन्य कालावधीसाठी करण्यात येईल :

"परंतु आणखी असे की, वरील मागण्यात आलेल्या डे-अहेड मुक्त प्रवेशावर दिलेले वेळापत्रक किमान आठ तासांच्या कालावधीसाठी समान राहील आणि कोणत्याही वेळी दिवसभरातील किमान वेळापत्रक दिवसाच्या कमाल वेळापत्रकाच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी असणार नाही."

परंतु आणखी असे की, किमान आठ तासांसाठीचे वेळापत्रक आणि कोणत्याही वेळी कमाल वेळापत्रकाच्या ७५ टक्क्यांची वरील अट वितरण परवानाधारक आणि पूर्णतः पारेषण मुक्त प्रवेश उपयोगकर्त्यांना लागू राहणार नाही."

**८. मुख्य विनियमांच्या विनियम १४ मध्ये सुधारणा**

विद्यमान परंतुकामध्ये नवीन उप-खंड विनियम १४.१(सी), (डी) आणि (इ) खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येतील :—

"(सी) मुक्त प्रवेश ग्राहकांच्या अशा वारंवार होणाऱ्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांच्या प्रकरणी लागू असलेले अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकार आर्थिक वर्षादरम्यान प्रत्येक दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी अनुक्रमे १.२५, १.५ आणि २.० च्या गुणाकाराच्या पटीने वाढविण्यात येतील त्यानंतर अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठीचे आकार मान्यता दिलेल्या अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकारांच्या दुप्पट देय राहतील :

परंतु आणखी असे की, विद्यमान अल्प-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक, जो या विनियमांच्या अधिसूचनेनंतर मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी अर्ज करील आणि दरम्यानच्या काळात अल्प-कालिन मुक्त प्रवेश प्राप्त करीत असेल, त्याला या सुधारीत विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरुवातीच्या ३ महिन्यांसाठी उपरोक्त तरतुदीसाठी अर्ज करण्यापासून वगळण्यात आले आहे परंतु त्यानंतर वरीलप्रमाणे गुणाकाराच्या पटीत अल्प-कालिन मुक्त प्रवेश आकार लागू करण्याच्या अधीन राहील :

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाने अल्प-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी लावावयाच्या आकारांचे नियमन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम, २०१५ आणि त्यातील सुधारणांमधील तरतुदींद्वारे करण्यात येईल.

(डी) नूतनशील ऊर्जेवर आधारीत मध्यम-कालिन मुक्त प्रवेश आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश व्यवहारासाठी लागू असलेले पारेषण आकार प्रति युनिट तत्त्वावर राहतील, यामध्ये हे पारेषण आकार अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी मान्यता दिलेल्या पारेषण आकारांच्या दुपटीच्या सममूल्य राहतील हा अपवाद राहील.

(इ) अल्प-कालिन मुक्त प्रवेश प्राप्त करणारे अंशतः मुक्त प्रवेश ग्राहक, जरी ते ज्या वीजनिर्मात्याकडून वीज घेत आहेत त्या वीजनिर्मात्यांनी राज्य पारेषण कंपनीशी ठोक वीज पारेषण करार केला असला किंवा नसला तरी, अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठीचा पारेषण आकार अदा करण्यास जबाबदार राहतील."

**९. मुख्य विनियमांमध्ये नवीन विनियम १४.९ खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल**

नवीन विनियम १४.९ खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल :—

"१४.९ ऊर्जा क्रेडीटच्या समायोजनासाठी प्राधान्य

मुक्त प्रवेश ग्राहकांनी वेगवेगळ्या स्त्रोतांपासून केलेल्या विजेच्या खेचणीचे समायोजन खाली देण्यात आलेल्या कमी प्राधान्य क्रमाने राहील आणि लागू असलेल्या हानिचे समायोजन केल्यानंतर, प्रत्येक काल-गटासाठी त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

(अ) नूतनशील ऊर्जा निर्माते

(ब) स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प

(क) बँक केलेली ऊर्जा

(ड) दीर्घ-कालिन द्विपक्षीय खरेदी

(इ) मध्यम-कालिन मुक्त प्रवेश

(एफ) पॉवर एक्स्चेंज व्यवहारांसह अल्प-कालिन आंतर-राज्य मुक्त प्रवेश

(जी) अल्प-कालिन आंतर-राज्य मुक्त प्रवेश

(एच) वितरण परवानाधारक

परंतु असे की, एकसारख्या वर्गवारीसाठी एकापेक्षा अधिक स्त्रोतांकडून जमा केलेल्या ऊर्जेच्या बाबतीत अशा स्त्रोतांपासून करारबद्ध केलेल्या निर्मिती क्षमतेच्या यथाप्रमाण तत्त्वावर अशा ऊर्जेचे समायोजन करण्यात येईल."

**१०. मुख्य विनियमांमध्ये नवीन विनियम १४.१० खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल :**

नवीन विनियम १४.१० खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल :—

"१४.१०. पॉवर फॅक्टर प्रोत्साहन-अधिदान/पॉवर फॅक्टरच्या दंडाची उपलब्धता :

महिन्याभरात बॅन्क्ड केलेल्या ऊर्जेचे आणि प्रत्यक्ष मुक्त प्रवेशाच्या वापराचे समायोजन केल्यानंतर, वितरण परवानाधारकाकडून मुक्त प्रवेश ग्राहकाला आणि स्व-वापरासाठीच्या उपयोगकर्त्याला पुरविण्यात आलेल्या केवळ नक्त ऊर्जेसाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या वीज दराच्या आदेशाच्या वीज दर वेळापत्रकामध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार पॉवर फॅक्टर प्रोत्साहन-अधिदान मिळण्याचा हक्क किंवा पॉवर फॅक्टरच्या दंडाची वसुली, जसे असेल तसे, लागू राहील."

**११. मुख्य विनियमांच्या विनियम १६ मध्ये सुधारणा :**

विद्यमान विनियम १६.३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"१६.३ नूतनशील ऊर्जेच्या दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये "अनिश्चित वीज" निर्मिती करणारा म्हणून ठरविलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ सौर आणि पवन ऊर्जा निर्मितीकरिता पूर्वानुमान, काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि तफावतीची हिशोबपूर्ती ] विनियम, २०१८ मधील तरतुदींनुसार करण्यात येईल."

**१२. मुख्य विनियमांच्या विनियम १७ मध्ये सुधारणा :**

नवीन खंड १७.५ खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल :—

"१७.५ बहुविध निर्मिती संच असलेली निर्मिती केंद्रे ज्यामध्ये एक किंवा अधिक संच स्व-वापरासाठीच्या किंवा त्रयस्थ पक्षाच्या मार्गाने करारबद्ध करण्यात येतात, अशी निर्मिती कंपनी या विनियमांच्या अधिसूचनेपासून सहा महिन्यांच्या आत स्वतःच्या खर्चाने प्रत्येक निर्मिती संचासाठी स्वतंत्रपणे, नोडल एजन्सी आणि/किंवा एमएसएलडीसीने ठरवून दिलेल्या आवश्यकतेनुसार, विशेष ऊर्जा मीटर्स बसविल :

परंतु असे की, बसविण्यात आलेले विशेष ऊर्जा मीटर्स कोणत्याही वेळी राज्य पारेषण कंपनी किंवा एमएसएलडीसीला पर्यवेक्षणासाठी उपलब्ध असतील :

परंतु असे की, वीज निर्मात्यांनी स्वतःच्या खर्चाने वितरण परवानाधारकाकडून विशेष ऊर्जा मीटर बसविण्याचा पर्याय स्वीकारला असल्यास वितरण परवानाधारक असे विशेष ऊर्जा मीटर बसविल. विशेष ऊर्जा मीटर बसविण्यात येईतोवर मधल्या काळात, वितरण परवानाधारक अशा ग्राहक/निर्मात्यांना मुक्त प्रवेश नाकारणार नाही :

परंतु आणखी असे की, पारेषण यंत्रणेशी जोडलेली अशी निर्मिती केंद्रे, नोडल एजन्सी आणि/किंवा एमएसएलडीसीने ठरवून दिलेल्या तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार नियंत्रण केंद्राशी त्यांची एकात्मता साधण्यासाठी लागणाऱ्या संपर्क व्यवस्थेचा खर्च स्वतः करतील."

**१३. मुख्य विनियमांच्या विनियम १८ मध्ये सुधारणा :**

विनियम १८.२ च्या विद्यमान परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"१८.२ राज्यांतर्गत पारेषण :

...

परंतु असे की, ऊर्जेची हिशोबपूर्ती राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये मान्यता दिलेल्या हानिच्या आधारावर करण्यात येईल."

**१४. मुख्य विनियमांच्या विनियम १९ मध्ये सुधारणा :**

ए. विनियम १९.१ च्या विद्यमान परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :

परंतु असे की, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार अधिसूचना अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, राज्य पूलमध्ये सहभागी असलेल्या मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्रे आणि परवानाधारकांना अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती पद्धतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ऊर्जा संतुलन आणि हिशोबपूर्तीच्या तरतुदी किंवा आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अन्य पद्धत, लागू राहील.

बी. विनियम १९.१ मध्ये वर प्रस्तावित केलेल्या परंतुकांच्या सुधारणेच्या खाली नवीन परंतुकाची भर घालण्यात येईल :

"परंतु आणखी असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (तफावतीच्या हिशोबपूर्तीची कार्यपद्धती आणि संबंधित बाबी) विनियम, २०१९ नुसार प्रभावी दिनांकानंतर, तफावतीचे लेखे ठेवण्याच्या अटी आणि त्याच्या तफावतीची हिशोबपूर्ती महाराष्ट्रासाठीच्या तफावतीच्या हिशोबपूर्तीच्या कार्यपद्धतीचे नियमन करणाऱ्या विनियमांनुसार करण्यात येईल."

**१५. मुख्य विनियमांच्या विनियम १९ मध्ये सुधारणा :**

विद्यमान विनियम १९.२ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"१९.२ अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकाच्या संबंधात वीज खेचणीच्या ठिकाणी ऊर्जेची हिशोबपूर्ती : अंशतः मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत विजेचे निर्धारित आणि प्रत्यक्ष केलेले अंतःक्षेपण (इंजेक्शन)/खेचलेली वीज (ड्रॉअल) यामधील तफावतीची हिशोबपूर्ती वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धती आणि आकारांनुसार करण्यात येईल."

**१६. मुख्य विनियमांच्या विनियम २७ मध्ये सुधारणा :**

विद्यमान विनियम २७.१.३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"२७.१.३ राज्य पारेषण कंपनीने खालील गृहितकांवर निश्चित केलेला नक्त विद्यमान मूल्याची परिगणना करण्यासाठीचा सवलत दर भांडवलाचा करोत्तर भारांकित सरासरी खर्च असेल.

(ए) कर्ज : भागभांडवल गुणोत्तर ७०:३०

(बी) प्रचलित बहु-वर्षीय वीज दर विनियमांतर्गत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पारेषण व्यवसायासाठी लागू असलेल्या दराच्या सममूल्य भागभांडवलावरील करोत्तर परतावा.

(सी) निधीवर-आधारित व्याज दराने कर्जावर एक वर्षात होणारा सीमान्तिक खर्चाप्रमाणे (एमसीएलआर) परिगणना केलेला व्याज दर + १.५ टक्के, जर एमसीएलआर संबंधित आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशीचा असेल तर."

**१७. मुख्य विनियमांच्या विनियम ३५ मध्ये सुधारणा :**

विनियम ३५.३ च्या परंतुकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येईल :—

"परंतु असे की, वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या या विनियमांतील विजेचे बँकींग, देयक मागणीची व्याख्या, विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) आणि वीज खेचण्याच्या (ड्रॉअल) ठिकाणांतील बदल आणि करारांतर्गत मागणीत सुधारणा या संबंधातील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, प्रचलित असलेल्या पारेषण मुक्त प्रवेश करार किंवा संविदांना देखील लागू राहतील :

परंतु आणखी असे की, मुख्य विनियमांतील बँकींग संबंधातील तरतूद मुख्य विनियमांच्या पहिल्या सुधारणेच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी अस्तित्वात असलेल्या मुक्त प्रवेश करार आणि संविदांना अशा मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी मान्यता दिलेला कालावधी संपुष्टात येईपर्यंत लागू राहील, त्यानंतर मुख्य विनियमांच्या पहिल्या सुधारणेमधील बँकींग संबंधातील तरतूद लागू राहील :

परंतु आणखी असे की, ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक ज्याने मुख्य विनियमांतर्गत महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागण्यासाठी अर्ज केलेला असेल आणि ज्याच्या अर्जाची हे विनियम किंवा त्यातील सुधारणा अंमलात येण्याच्या दिनांका रोजी छाननी चालू असेल त्याने पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही आणि अशा अर्जाची छाननी सुधारणा केलेल्या विनियमांच्या तरतुदींतर्गत करण्यात येईल."

**१८. मुख्य विनियमांमध्ये नवीन विनियम ३६ ची भर :**

मुख्य विनियमांमध्ये विनियम ३६ म्हणून नवीन विनियमाची भर घालण्यात येईल :—

"३६. शिथील करण्याचे अधिकार :

आयोग, स्वतःहून किंवा आयोगासमोर हितसंबंधित व्यक्तीने केलेल्या अर्जाच्या संदर्भात, या विनियमांतील कोणतीही तरतूद सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाद्वारे शिथील करू शकेल ; मात्र त्यापूर्वी, यासंबंधीच्या कारणांची लेखी नोंद करण्यात येईल आणि शिथील करण्यास मंजुरी दिल्यामुळे बाधित होऊ शकणाऱ्या व्यक्तींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल."

**अभिजीत देशपांडे,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

दिनांक : ७ जून २०१९.
ठिकाण : मुंबई.

**MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION**

Trade Centre, Centre No. 1, 13th Floor, Cuffe Parade, Mumbai 400 005.

Tel. 022-2216 3964/65/69 Fax no. 022-2216 3976

Email: mercindia@merc.gov.in

Website: www.merc.gov.in

*NOTIFICATION*

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Tech/2019/098.— In exercise of the powers conferred under Sections 86(*3*) and 181 of the Electricity Act, 2003 and all other powers enabling it in this behalf, and after previous publication, the Maharashtra Electricity Regulatory Commission makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Open Access) Regulations, 2016 ('the Principal Regulations') namely :—

**1. Short title and commencement**

1.1. These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Transmission Open Access) (First Amendment) Regulations, 2019.

1.2. These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette.*

**2. Amendment to Regulation 2 of the Principal Regulations :**

The following definitions shall be amended in Regulation 2 of the principal Regulations :—

*"(13) "Contract Demand" means the demand in kilovolt ampere ('kVA') or Megavolt ampere ('MVA') as mutually agreed between the Distribution Licensee and the Consumer*

*(i) in the agreement for supply of electricity; or*

*(ii) through other written communication."*

*"(14) (a) "Gross metering" means a metering arrangement wherein, the entire energy generated by rooftop solar PV system is fed into the electrical grid subject to permissible technical limits as per interconnection standard and the system owner is benefited by way of sale of solar power to the Distribution Licensee at rate approved or adopted by Commission;"*

*"(17) "Long-term Open Access" or "LTOA" means the right to use the Intra-State Transmission System for a period exceeding* ***seven*** *years;"*

*"(18) "Medium-term Open Access" or 'MTOA' means the right to use the Intra-State Transmission System for a period exceeding three months but not exceeding five years;"*

*"(30) "Time Block" means the period of 15-minute or any such shorter duration as may be notified by Central Commission and State Commission, for which Special Energy Meters record specified electrical parameters and quantities, with the first such period starting at 00:00 hours;"*

**3. Amendment in Regulation 3 of the Principal Regulations :**

A. New provisos shall be added below the existing third proviso to Regulation 3 as under :

*"Provided further that Partial Open Access Consumer shall be permitted to avail Open Access for the capacity not exceeding its existing Contract Demand with the Distribution Licensee on the date of application, whereas, Full Open Access Consumer shall be permitted to avail Open Access for capacity not exceeding its sanctioned load :*

*Provided further that for Partial Open Access Consumer seeking to source power using Open Access from renewable energy based generators, the above specified capacity limit up to contract demand or sanctioned load shall not be applicable, subject to conditions of resultant power flow specified under Regulation 8.11 :*

*Provided further that Consumers intending to have Roof-Top Solar Photo Voltaic Systems can simultaneously avail open access under these Regulations subject to condition that in such cases, the credit for solar generation shall be adjusted on Gross metering basis for such period for which open access is availed by the Consumer. The applicable rate for sale under such Gross metering arrangement shall be equivalent to the rate stipulated under the yearly Generic tariff Order for Renewable Energy Technologies or based on the principles stipulated therein."*

**4. Amendment in Regulation 6 of the Principal Regulations :**

A. The existing Regulation 6.7 shall be substituted as under :—

*"6.7. The charges for testing and tariff of such infirm power from a Generating Station, other than one based on Renewable Energy sources, shall be as specified in the Regulations of the Commission governing Deviation Settlement Mechanism and the same shall be applicable from the Effective Date of MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019 :*

*Provided that prior to the Effective Date as per MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019 such charge for testing and tariff for infirm power from a Generating Station, other than one based on Renewable Energy, shall be as specified in the Regulations of the Commission governing Multi-Year Tariff:"*

*Provided further that the power injected into the grid on account of such testing from a Generating Station for which tariff has not been determined by the Commission shall be the lower of the following:*

*(a) the rate for imbalance as applicable under a system or mechanism approved by the Commission under the Intra-State Balancing and Settlement Code; or*

*(b) the average variable cost of long-term power purchase as approved by the Commission in the prevailing Tariff Order in respect of the Distribution Licensee to whom the Generating Station intends to sell power."*

B. The existing third proviso of Regulation 6.8 shall be amended as under :

*"Provided also that, prior to the Effective Date of MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019, before injecting infirm power, the Generating Station shall enter into an agreement with the Distribution Licensee to supply such power, in the absence of which there shall be no*

*charge for such infirm power injected into the grid, and it shall be credited to the Distribution Licensee to whom the Generating Station is connected under the provisions of the Intra-State Balancing and Settlement Mechanism operating in Maharashtra."*

C. A new proviso shall be added governing the MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations 2019, below the above amendment to Regulation 6.8 :

*"Provided further that, post the Effective Date as per MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019, the conditions for Infirm Power injection and treatment thereof shall be governed as per Regulations governing Deviation Settlement Mechanism for Maharashtra."*

**5. Amendment in Regulation 7 of the Principal Regulations :**

The Regulation 7.2 shall be amended as under :

*"7.2. The nature and periods for which Open Access of the Intra-State Transmission System may be sought shall be as categorised below:*

| *Open Access Category* | *Duration* |
|---|---|
| *Long-term Open Access* | *Exceeding seven years* |
| *Medium-term Open Access* | *Exceeding three months but not exceeding five years* |
| *Short-term Open Access* | *Not exceeding one month* |

**6. Amendment in Regulation 8 of the Principal Regulations :**

A new proviso shall be added above the existing first proviso to Regulation 8.1 as under :

*"Provided that nodal agency shall process the application for STOA and MTOA including application fee only through online mode. Necessary web-portal functionalities for online processing with secured payment gateways shall be established by the Nodal Agency with suitable amendment to the procedures within three months. The software shall necessarily include day or time punching of the complete process and the trails of this process or processing shall also be available in the system"*

**7. Amendment in Regulation 11 of the Principal Regulations :**

Three new provisos shall be added to Regulation 11.2 (a) as under :

*"Provided that the application for grant of Day-Ahead Open Access shall be made for continuous period of minimum duration of 8 hours or such other duration of number of time-blocks to be stipulated through separate Order from time to time either on Suo-motu basis or on the basis of application moved by affected party.*

*Provided further that the schedule given against the above day ahead open access sought shall be uniform at least for a period of eight hours and the minimum schedule during the day shall at any time not be less than 75% of the maximum schedule of the day.*

*Provided further that above conditions for scheduling for minimum eight hours and 75% of maximum schedule at any time, shall not be applicable for distribution licensees and full TOAUs."*

**8. Amendment in Regulation 14 of the Principal Regulations :**

New sub-clauses 14.1 (c), (d) and (e) shall be inserted below the existing provisions as follows :

*"(c) Provided that the applicable transmission charges in case of such repeated STOA transactions of Open Access Consumer(s) shall be increased by a multiplication factor of 1.25, 1.5 and 2.0 respectively for every 2nd, 3rd and 4th STOA transaction during financial year beyond which the transmission charges for STOA shall be payable at two times of the approved transmission charges for STOA :*

*Provided further that existing STOA consumer that applies for MTOA subsequent to notification of these Regulations and in the interim avails STOA, shall be exempted from application of the aforesaid provision for an initial period of three months from the date of notification of these amended Regulations but shall be subjected to applicability of multiplication factor as above, thereafter :*

*Provided further that charges for STOA transactions by Distribution Licensee shall be governed by the provisions in the Maharashtra Electricity Regulatory Commission (Multi Year Tariff) Regulations, 2015 and amendments thereof.*

*(d) For renewable energy based MTOA and LTOA transactions, the applicable transmission charges shall continue to be on per unit basis, except that the same shall be equivalent to two times the approved charges for short term open access.*

*(e) Partial Open Access Consumers availing STOA are liable to pay the Transmission Charges irrespective of whether or not the Generator from whom they source power has a BPTA with the STU."*

**9. Insertion of a new Regulation 14.9 in the principal Regulations :**

A new Regulation 14.9 shall be inserted as follows :

*"14.9 Priority for adjustment for Energy Credits*

*The priority for adjustment of energy drawl by an open access consumer from different sources shall be as per the following sequence of reducing priority and shall be implemented for each time block, upon adjustment of applicable losses.*

*(a) Renewable Energy Generators*
*(b) Captive Generating Plant*
*(c) Banked Energy*
*(d) Long term Bilateral purchase*
*(e) Medium term open access*
*(f) Short term inter-State open access including power exchange transactions*
*(g) Short term intra – State Open access*
*(h) Distribution Licensee*

*Provided that in case of energy credit from more than one source from the similar category shall be adjusted on pro-rata basis of the contracted generation capacity from such source."*

**10. Insertion of a new Regulation 14.10 in the principal Regulations :**

A new Regulation 14.10 shall be inserted as follows :

*"14.10. Availability of PF Incentive/PF Penalty*

*Entitlement to PF incentives or levy of PF penalty, as the case may be, as specified under Tariff Schedule of the Tariff Order issued from time to time shall be applicable only for the net energy supplied by Distribution Licensee to the Open Access consumer and captive user after adjusting the banked energy and actual open access consumption during the month."*

**11. Amendment in Regulation 16 of the Principal Regulations :**

The existing Regulation 16.3 shall be amended as under :

*"16.3. Scheduling of renewable Energy Generating Plant(s) identified as 'non-firm power' under the Commission's Regulations governing Renewable Energy Tariff shall be governed as per provisions of Maharashtra Electricity Regulatory Commission (Forecasting, Scheduling and Deviation Settlement for Solar and Wind Generation) Regulations, 2019."*

**12. Amendment in Regulation 17 of the Principal Regulations :**

A new clause 17.5 shall be inserted as follows :

*"17.5. Generating Stations having multiple generating units wherein one or more units are contracted under captive route or third party route, such Generating Company, shall install at their cost, Special Energy Meters, separately for each generating unit, within six months from the notification of these Regulations, in accordance with requirements stipulated by the Nodal Agency and/or MSLDC.*

*Provided that the installed Special Energy Meters shall be available for inspection by the STU or the MSLDC at any time:*

*Provided that if generator opts for installation of Special Energy Meter by the Distribution Licensee at the former's cost, latter shall install the same. In the intervening period till installation of Special Energy Meter, Distribution Licensee shall not deny Open Access to such consumer/generator.*

*Provided further that such Generating Stations connected to Transmission Systems shall bear the cost of communication arrangements for its integration into Control Centre as per the technical specifications stipulated by the Nodal Agency and/or MSLDC."*

**13. Amendment in Regulation 18 of the Principal Regulations:**

The existing proviso of Regulation 18.2 shall be amended as under:

*"18.2 Intra-State Transmission:*

*...*

*Provided that the energy settlement shall be based on the approved loss in the Intra-State Transmission System."*

**14. Amendment in Regulation 19 of the Principal Regulations :**

A. The existing proviso of Regulation 19.1 shall be amended as under :

*"Provided that, prior to the Effective Date of MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019, the provisions regarding energy balancing and settlement contained in the Final Balancing and Settlement Mechanism or any other such mechanism as may be stipulated by the Commission shall be applicable in the case of Open Access Consumers, Generating Stations and Licensees who are participants of the State Pool."*

B. A new proviso shall be added to Regulation 19.1 below the above amended proviso as under:

*"Provided further that, post the Effective Date as per MERC (Deviation Settlement Mechanism and related matters) Regulations, 2019, the conditions for Deviation Accounting and settlement of deviations thereof shall be governed as per Regulations governing Deviation Settlement Mechanism for Maharashtra."*

**15. Amendment in Regulation 19 of the Principal Regulations :**

The existing Regulation 19.2 shall be amended as under :

*"19.2. Settlement of Energy at Drawal Point in respect of Partial Open Access Consumer: Deviations between the scheduled and the actual injection/drawal in respect of a Partial Open Access Consumer shall be treated in accordance with the methodology and charges specified in the Regulations of the Commission governing Distribution Open Access."*

**16. Amendment in Regulation 27 of the Principal Regulations :**

The existing Regulation 27.1.3 shall be amended as under :

*"27.1.3. The discount rate for computing the Net Present Value shall be the post-tax Weighted Average Cost of Capital, determined by the STU with the following assumptions:*

*(a) Debt : Equity ratio of 70:30*

*(b) Post-tax Return on Equity equivalent to the rate as applicable for transmission business as specified under prevalent MYT Regulations.*

*(c) Interest rate calculated as one-year Marginal Cost of Funds-based Lending Rate ('MCLR') + 1.5%, where the MCLR is as on the first day of the respective financial years."*

**17. Amendment in Regulation 35 of the Principal Regulations:**

The proviso under Regulation 35.3 shall be amended as under :

*"Provided that the provisions of these Regulation, as amended from time to time governing Distribution Open Access relating to Banking of power, the definition of Billing Demand, change in injection or drawal point, and revision in Contract Demand with amendments thereof shall also be applicable to existing Transmission Open Access Agreements or contracts;*

*Provided further that provision relating to Banking of the Principal Regulations shall continue to apply for existing Open Access Agreements or contracts as on date of notification of the first amendment of the Principal Regulations, till the expiry of the approved period for such OA transactions, beyond which provision relating to Banking of the first amendment of the Principal Regulations shall apply.*

*Provided further that a Consumer, Generating Station or Licensee who has applied for Open Access to the Intra-State Transmission System in Maharashtra under the Principal Regulations and whose Application is under process on the date of coming into force of these amendments, need not reapply, and such Applications will be processed under the provisions of these amended Regulations"*

**18. New Regulation 36 to the Principal Regulations :**

A new Regulation shall be added as Regulation 36 to the Principal Regulations :

*"36. Power to Relax*

*The Commission may by general or special order, for reasons to be recorded in writing, and after giving an opportunity of hearing to the parties likely to be affected by grant of relaxation, may relax any of the provisions of these Regulations on its own motion or on an application made before it by an interested person."*

ABHIJIT DESHPANDE,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Date: 7 June, 2019.
Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.